**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक : ३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- १३/०६/२०१४

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९मधील अनुसुची "ड" प्रकरण २ नियम ३(क) अन्वये** अहमदनगर महानगरपालिकेच्या **स्थायी समिती विशेष सभा क्र-३ सोमवार दि. १६/०६/२०१४रोजी दुपारी १.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**सोमवार दिनांक- १६/०६ /२०१४ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १७ | अहमदनगर महानगरपालिका अभिकर्ता संस्था चालवित असलेल्या शहर बससेवेस देण्यांत येणा-या मासिक तोटा भरपाई अनुदानामध्ये वाढ व बससेवेतील आठ बसेस कमी करून अन्यत्र हलविणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- १७ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती विशेष सभा क्र. ३**

विषय क्रमांक- १७ सोमवार दि.१६/०६/२०१४

ठराव क्रमांक- १७ सोमवार दि.१६/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका अभिकर्ता संस्था चालवित असलेल्या शहर बससेवेस देण्यांत येणा-या मासिक तोटा भरपाई अनुदानामध्ये वाढ व बससेवेतील आठ बसेस कमी करून अन्यत्र हलविणेबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा मोटार व्हेईकल विभाग दि.१०/३/२०१४

संदर्भ- १.मे.प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्यु. प्रा.लि. यांचेकडील पत्र जा.क्र.२५ दि.१६/१०/२०१३ व
२. जा.क्र.०३ दि.०५/०३/२०१४

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये सादर करण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र.१ व क्र.२ अन्वये सदर पत्रामध्ये महापालिकेने ऑक्टोंबर २०१३ पासून मंजूर केलेली तोटा भरपाईची रक्कम रू.२,९६,०००/- ही अभिकर्ता संस्थेस दरमहा होत असलेला तोटा लक्षात घेता अतिशय कमी असल्याने त्यात वाढ करण्याबाबत विनंती करण्यांत आलेली असून आर्थिक नुकसान कमी होण्याच्या उद्देशाने शहर बस ताफ्यातील ८बसेस अन्यत्र हलविण्याबाबत मागणी करण्यात आली होती. या मागण्यांची महानगरपालिकेकडून पूर्तता न झाल्यास दि.०१ नोव्हेंबर २०१३ पासून आर्थिक अडचणींमुळे शहर बस बंद करण्याबाबत ही कळविण्यात आले होते. तथापि, महानगरपालिका निवडणूकीमुळे कार्यान्वीत झालेली आचारसंहिता विचारात घेता,वरील संदर्भ क्र.२ व ३ अन्वये दिलेली बंदची नोटीस अबाधित ठेवून शहर बससेवा बंदची कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यात आली.दरम्यान निवडणूक प्रक्रिया पूर्ण होवूनही सुमारे दोन महिन्यांचा कालावधी होवूनही वरील संदर्भात पत्रावर कोणताही निर्णय अदयाप महानगरपलिकेकडून झालेला नाही.तरी सुध्दा आपण दिलेल्या आश्वासनांवर विसंबून अभिकर्ता संस्थेने सातत्याने तोटा सहन करून गेले दोन महिने बससेवा सुरू ठेवली आहे.

आज दि.०५/०३/२०१४ पासून आचारसंहिता कार्यान्वित करण्यात आल्यामुळे लोकसभा निवडणुकीची कार्यप्रणाली पूर्ण होवू पर्यत शहर बससेवेबाबत निर्णय होणे संभवनीय नाही.या संदर्भात कळविण्यात येते की, डिझेलदर तसेच स्पेअरपार्टस व टायर्स यांच्या किंमतीमध्ये होत असलेली लक्षणीय वाढ यामुळे संस्थेला मोठया प्रमाणावर आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याने अभिकर्ता संस्था खालीलप्रमाणे मागण्या करीत आहे.

१] मासिक तोटा भरपाईची रक्कम रूपये २,९६,०००/- ऐवजी रू.७ लाख पूर्वलक्षी प्रभावाने अदा करण्यांत यावी.

२] शहर बससेवेस होत असणारे नुकसान कमी करण्या करीता बस ताफयातील ०८ बसेस अन्यत्र हलविण्याची त्वरीत अनुमती दयावी.

वरील मुदयाबाबतची पुर्तता न झाल्यास अत्यंतीक आर्थिक अडचणींमुळे नाईलाजास्तव शहर बससेवा बंद करण्यांत येईल,याची कृपया नोंद घ्यावी.येणेप्रमाणे अभिकर्त्याचे पत्र प्राप्त झालेले आहे.

सदर पत्रामध्ये अभिकर्ता संस्थेने मासिक तोटा भरपाईची रक्कम रू.२,९६,०००/-ऐवजी रू.७.००लाख पूर्वलक्षी प्रभावाने अदा करणेविषयी मागणी केलेली आहे.अभिकर्ता संस्थेची सदरची

...२

मागणी अवास्तव स्वरूपाची असून महानगरपालिकेस बससेवेव्दारे अर्थिक फायदा होत नाही.नागरीकांचे प्रवासाचे सोयीकरीता महानगरपालिकेने सुरू केलेली आहे.बससेवेस महानगरपालिकेचे सर्वतोपरी सहकार्य असून यापूर्वी मा.स्थायी समितीच्या मंजुरीने जागा भाडेपोटी रूपये १७,४०,०००/- अदा करण्यात आलेले असून तदनंतर मा.महासभा ठराव क्र.२४ दिनांक १५/१०/२०१३ अन्वये प्रतिमहा रूपये २,९६,०००/- प्रमाणे आक्टोबर ते जानेवारी पर्यत रूपये ११,८४,०००/- अदा करणेत आले असून पुढील कार्यवाही देखील चालू आहे.अभिकर्ता संस्थेने बसेसची संख्या/कर्मचारी संख्या कमी केलेली आहे,अभिकर्ता संस्थेची मासिक रू.०७.०० लाख तोटा भरपाई रकमेची मागणी अवास्तव आहे.

महानगरपालिका व अभिकर्ता संस्थेतील करारनाम्यानुसार एकूण ३० बसेस देण्याचे ठरले होते. तथापी अभिकर्त्याने फक्त २३ बसेस दिलेल्या होत्या.त्यातुनही बसेस कमी करणेची मागणी आहे.वास्तविक नगर शहराचा वाढता विस्तार तसेच नागरीक व मा. पदाधिका-यांची नविन मार्ग सुरू करणेबाबतची मागणी लक्षात घेता बसेस वाढविण्याची आवश्यकता आहे.

अभिकर्ता संस्थेचे सदर पत्रातील दोन्ही मुददे अवास्तव आहेत.तसेच याबाबत निर्णय वरिष्ठ स्तरावर होणे संयुक्तीक होईल.याकरीता अभिकर्त्याचे पत्रानुसार पुढील निर्णय घेणेकामी पत्र व रिपोर्ट मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव सादर.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर मोटार व्हेईकल विभाग यांचा अभिप्राय की, अहवालातील नमूद अभिकर्त्याची मागणी अवास्तव वाटते. यास्तव वरिष्ठ स्तरावर निर्णय घेणे उचित राहील आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार व व्यवस्थापक , अ.नगर शहर बससेवा यांचे दि.५/३/२०१४ चे पत्राचे अवलोकन करता त्यांच्या मागण्या अवास्तव असल्याने आहे त्याच तोटा भरपाई रक्कम अभिकर्त्याने स्वीकारून बससेवा सुरू ठेवावी. असे कळविणे योग्य राहील.आदेशार्थ मे. रिपोर्ट नुसार आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, समक्ष चर्चा करावी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, समक्ष चर्चा केली, चर्चेनुसार फेर सादर करणे.

***

मा.फेरसादर,

संदर्भ - प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्यु., प्रा.लि. यांचेकडील पत्र जा.क्र.०५ दि.१९/४/२०१४

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये विनंतीपुर्वक सादर करण्यांत येते की, अभिकर्ता संस्थेला अहमदनगर शहरामध्ये शहर बससेवा सुरू ठेवण्याकरीता मोठया प्रमाणावर आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याने शहर बससेवा संबंधीच्या मागण्यांची पूर्तता करण्यात यावी. १] मासिक तोटा भरपाईची रक्कम रू.२,९६,०००/- ऐवजी रू.७ लाख पूर्वलक्षी प्रभावाने अदा करण्यात यावी. २] शहर बससेवेस होत असणारे नुकसान कमी करण्याकरीता बस ताफ्यातील ८ बसेस अन्यत्र हलविण्याची अनुमती दयावी. येणेप्रमाणे संदर्भिय पत्र प्राप्त झालेले आहे.

अहमदनगर मनपाने शहरातील नागरिकांचे प्रवासाचे सोयीकरीता अभिकर्ता संस्था नेमून

बससेवा सुरू केलेली आहे. बससेवा सुरळीत चालू राहणेकामी मनपाने सर्व स्तरावर अथक प्रयत्न केलेले आहेत. मा.जिल्हाधिकारी , रस्ता सुरक्षा समिती, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी , पोलिस अधिक्षक, एस.टी. महामंडळ , विभागीय आयुक्त नाशिक, मा. शासन मुंबई इत्यादी ठिकाणी पत्रव्यवहार, मिटींग घेवून बससेवेस सहकार्य करण्यात आलेले आहे. तिकीट दरवाढ , बसथांबे, करमाफी , जागा उपलब्ध करणे, जागा भाडे अदा करणे अशा विविध प्रश्नी मनपाचे अधिकारी / पदाधिकारी यांनी बससेवेस अनेक घटनांमध्ये सहकार्य व सवलती दिलेल्या आहेत अ. नगर मनपाने बससेवेस जागा भाडे पोटी तसेच तोटा नुकसान भरपाई करिता मा.स्थायी समिती ठराव क्र. २४ दि-.....अन्वये बससेवेस आजअखेर रू........ रकमेची मनपामार्फत मदत झालेली आहे. तसेच आजही दरमहा रू.२,९६,०००/- तोटा भरपाई रक्कम बससेवा सुरळीत सुरू रहावी याकरीता देण्यांत येत आहे. वास्तविक मनपाने बससेवा सुरू ठेवावी असे बंधनकारक नाही. परंतु मनपा आर्थिक तोटा सहन करून बससेवेस मदत करीत असून बससेवेतून आर्थिक उत्पन्न मनपास मिळत नाही.

अहमदनगर मनपा व अभिकर्ता संस्था यांचे मधील करारानुसार एकूण ३० बसेसपर्यत बसेस चालविण्याचे ठरले आहे. परंतू अभिकर्त्याने आजअखेर पर्यत एकूण ३० बसेस उपलब्ध केलेल्या नाहीत. मा. पदाधिकारी यांनी अनेक नवीन मार्ग सुरू करणेबाबत पत्र दिलेले असूनही अभिकर्त्याने बससेवेच नवीन मार्ग सुरू केले नाहीत. करारानुसार सर्व प्रकारचे दायित्व अभिकर्ता संस्थेचे आहे. बससेवेचे कर थकबाकी संदर्भात प्रवासीकर / बालकुपोषण कर भरणा बाकी बाबत मनपास पत्रव्यवहार करावा लागतो बससेवेस तोटा नुकसान भरपाई देणेकामी मा.स्थायी समिती ठरावान्वये मेकॅ. इंजि. व मु.ले.प. यांची नेमणूक केलेली आहे. अभिकर्त्याने सध्या फक्त १२ बसेसद्वारे बससेवा देत असल्याचे चौकशी अंती समजते पूर्वी एकूण २३ बसेस चालू होत्या परंतु सध्या १२ बसेस सुरू असल्याने सर्व प्रकारे खर्च कमी झालेला आहे. कर्मचारी संख्या , इंधन, स्पे.पार्ट शासकीय कर , वेतन इत्यादी बाबी वरील खर्च अनायसे कमी झालेला आहे. त्यामुळे पूर्वी देवू केलेली तोटा भरपाई रक्कम जादा असल्याचे वाटते. त्यामुळे अभिकर्त्याने पत्रात मागणी केलेली रक्कम रू.७ लाख मागणी अवास्तव आहे. तसेच बसेस अन्यत्र हलविणे बाबत कराराचा भंग ठरेल, शहरातील नागरिकांची तसेच पदाधिका-यांची नवीन मार्ग सुरू करणेबाबतची मागणी लक्षात घेता बसेस संख्या वाढविणे आवश्यक ठरते.

अभिकर्त्याचे सदरचे पत्रात केलेल्या मागणीचा निर्णय वरिष्ठ स्तरावर घेणे योग्य असल्याने सदरचे पत्र मा.स्थायी समितीकडे पुढील निर्णय घेणेकामी ठेवणे करीता मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर मॅके.इंजि. यांचा अभिप्राय की, मा.महासभा ठराव क्र.१५दि.११/७/२०१३अन्वये मेकॅ.इंजि. व मु.ले.प. यांनी तोटा भरपाई देणे संदर्भात अहवाल दिलेला आहे. सदर अहवाल,कागद पत्राची पाहणी,जमाखर्ची,ताळेबंद एकूण २३ बसेसनुसार रू.२,९६,०००/- देण्यात आलेले आहेत. परंतु सध्या अभिकर्ता संस्था १२ बसेस चालवित असून, बसेस संख्या कमी झाल्याने सर्व प्रकारे खर्च कमी झाल्याचे दिसते.त्यामुळे अभिकर्ता संस्थेची मागणी अवाजवी असून स्विकारार्य वाटत नाही. तथापि सदर बाबतचा निर्णय मा.स्थायी समितीकडे घेणे योग्य ठरेल मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर. **/अ**

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे निर्णय मा.स्थायी

समिती समोर घेणे योग्य ठरेल तथापि निर्णयास्तव सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मोटर वाहन विभागाच्या दि.३/४/२०१४ च्या अहवालानुसार कार्यवाही करणे उचित ठरेल.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की,१] मनपाने शहर बससेवा सुरू ठेवणेसाठी खाजगी अभिकर्त्या तोटा भरपाई देणे ही संकल्पना बहुधा अ.नगर मनपा येथेच असावी असे वाटते. यासाठी इतर मनपा / न.पा. सिटी शहर बससेवा चालविली जातो त्यांचेकडून मागणी मागविणेत यावी (जळगाव, धुळे, कल्याण डोंबिवली) , २] उक्त ठेकेदार यापूर्वी २३ बसेस चालवित होते., सध्या १२ बसेस आहेत करिता तोटा भरपाईची रक्कम ही त्याप्रमाण कमी करणेत यावी. असे मत आहे, ३] करिता मेकॅ.इंजि. व मु.ले.प. यांनी स्वतंत्र अहवाल दयावा., ४] ८ बसेस अन्यत्र हलविणेचा करारनामा भंग ठरले असे विभागाने प्रस्तावात म्हटले आहे ते करारनाम्याचा दिनांक, त्यातील पॅरेग्राफ,क्लॉज नं, पेज नं.इत्यादी सह नमूद करून करारनामा प्रस्तावासह सादर करणे उचित होईल.,५] महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास शहरात शहर बससेवा चालविणे बाबत विचारणा करणेत यावा असे ही मत आहे.,६] मनपाची आर्थिक परिस्थिती योग्य नाही.,७] महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ मधील (२०) नुसार मनपाच्या सभेच्या निर्णयानुसार तरतूद करता येईल. अशी ही शहर बससेवेची सेवा आहे.,८] सबब अभिकर्ता संस्थेची मागणी अवाजवी असुन स्विकारार्थ घेणे योग्य होणार नाही. त्यामुळे त्यांच्या अर्ज उपरोक्तानुसार निकाली काढणे योग्य राहील. असे मत आहे मे. आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, नमूद प्रस्ताव व त्यावरील उपायुक्त व मु.ले.प.यांचे अभिप्राय अवलोकन केले. त्यांचे अभिप्रायाशी सर्वसाधारण पणे सहमत होता येणार नाही. इतर शहरांची माहिती मागविणेस हरकत नाही. परंतु प्रत्येक शहरातील भौगोलिक परिस्थिती, आर्थिक स्थिती, व इतर बाबी भिन्न असतात. प्रस्तुतचे अहवालावर विचार करून त्यावर निर्णय होणेकामी मे.स्थायी समितीकडे सादर करणेस मान्यता देणेत येते.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अभिकर्ता संस्था चालवित असलेल्या शहर बससेवेस देण्यांत येणा-या मासिक तोटा भरपाई अनुदानामध्ये वाढ व बससेवेतील आठ बसेस कमी करून अन्यत्र हलविणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आले.

मा.सभापती साहेब :- पत्र केव्हा आले यापूर्वी पत्र दिले होते का ?

मेकॅ. इंजि.श्री. निकम :- दि.१२/६/२०१४ ला आले त्याचे अगोदर बंद करण्याबाबत पत्र दिले नव्हते.

मा.सभापती साहेब :- यापूर्वी दिलेल्या पत्राबाबत सभेपुढे का अवगत केले नाही. काय मागणी केली ते वाचून दाखवा.

मेकॅ.इंजि.श्री. निकम :- लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने सादर करता आले नाही.

मा.श्री. दिप चव्हाण :- १२/६/२०१४ चे पत्र स्थायी समिती सदस्यांना दिले नाही. पूर्वी दिलेले पत्र दाखवा हा विषय पूर्वीच्या पत्राचा आहे. ऑफिस रिपोर्ट मध्ये १२/६/२०१४ चे पत्र शहर बससेवा बंद करण्याबाबत आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- ही मिटींग १९/४/२०१४ चे पत्रानुसार आहे.

मा.सभापती साहेब :- आपण जी मिटींग कॉल केले त्या वेळेसचे पत्र वाचून दाखवा.

मेकॅ.इंजि. श्री.निकम :- सगळयात सुरवातीचे पत्र व तीनही पत्राच्या अनुषंशाने विषय आजच्या सभेत घेण्यात आला आहे.

मा.सभापती साहेब :- आपण तीन पत्राचे आधारे सभा बोलविली त्याचा ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

मेकॅ.इंजि.श्री.निकम :- ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.दिप चव्हाण :- आजची जी सभा बोलविली अजेंडा पाठवला त्याची तरतुद काय आहे.

प्र.नगरसचिव श्री. वैदय :- हा अजेंडा अनुसचूी ड प्रकरण २ मुद्दा क्र. ३ क प्रमाणे मांडला आहे त्यातील तरतुदी नुसार.

मा.श्री. दिप चव्हाण :- प्रकरण २ क नियम ३ प्रमाणे अधिकार कोणाला आहे.

प्र.नगरसचिव श्री. वैदय :- स्थायी समितीच्या अध्यक्षाने सभा बोलविली पाहिजे.

मा.श्री. दिप चव्हाण :- अजेंडयाला जा.क्र. असतो का, नियमाप्रमाणे नियम २ क याला अनूसरून स्थायी समिती व अजेंडयाला जा.क्र. होत नाही. प्रसंग काय उद्‌भवत आहे की जे तातडीचे प्रकरण ३ क मधील तरतुदीनुसार सभा बोलावली काय तातडी आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. बेहेरे :- १६ पासून सेवा बंद होणार आहे म्हणून

मा.श्री. दिप चव्हाण :- दि.८/२/२०१३ ला कोणता विषय होता. दि.१६/६/१४ पहिले पत्र दि.८/२/२०१३ ला प्रसन्ना पर्पल यांनी सेवा बंद करणेबाबत पत्र आहे. पत्र क्र.२ शहर बस बंद बाबत दि.८/२/२०१३ ची नोटीस उपायुक्त (कर) व्यवस्थापक प्रसन्ना पर्पल यांनी दिलेली आहे. १० एप्रिल चे व पत्र क्र.३ मा. जिल्हाधिकारी साहेब यांना दिलेले पत्र तारीख व वेळ मिळणेबाबत या बैठकीचे अवलोकन कुठे आहे पोलीस अधिक्षकांना याच संदर्भात पत्र, उपप्रादेशिक परिवहन यांनाही या संदर्भात पत्र दिले आहे. त्यांनी एकच पत्र थोडी दिले. तुम्ही भावनेशील मुद्दा करून जनतेच्या भावनेशी खेळत आहे हे सगळे पत्र व १२/६/२०१४ चे पत्र कोणी दिले.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- व्यवस्थापक प्रसन्ना पर्पल यांनी दिले आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- आपला करारनामा कोणा बरोबर झाला.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- प्रसन्ना पर्पल बरोबर झाल आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मध्ये करारनामानुसारच्या कॉलमप्रमाणे करार करणारे कोण आहे.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- संस्थेबरोबर करारनामा झालेला आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- करारनामा संस्थेबरोबर नाही यांनी पॉवर डेलीगेट का, त्यांनी तुम्हाला नोटीस दिली का. दिपक मगर चे या संस्थेचे करारनाम्यात नांव आहे का ? कलम ७३ अन्वये करार झालेला आहे. परदेशी ला पॉवर दिलेले आहे. मनपाचे वतीने मा.आयुक्त यांनी करार केला

...६

आहे. दिपक मगरला पत्रव्यवहार, मनपा बरोबर चर्चा करण्याचे अधिकार नोटीस घ्यायचे अधिकार त्याला पॉवर डेलीगेट केलेले आहेत का दि.८/२/२०१३ श्री. दिपक मगर , व्यवस्थापक यांचे सहीने दिलेली आहे. करारनाम्याच्या साठी अधिकार दिले तोच पत्र देवू शकतो. आतपर्यत मनपाला दिलेले पत्र कसे अधिकृत ठरेल.

मा.श्री. दिप चव्हाण :- करारनाम्यामध्ये मा.आयुक्ताला सुध्दा अधिकार ठेवलेले नाही. पान नं.५ वरील कलम १५ वाचा वाचुन दाखविले मिर्टीग करू नये करारनाम्यात तो म्हणतो मग कसे काय मिर्टीग करता कशाचे आधारे चर्चा करायची पंधराची अट वाचून दाखविली आयुक्ताला नियंत्रण राहिल हे कोणत्या कायदयान्वये म्हटले आहे. जेव्हा परिवहन समितीच अस्तीत्वात नाही. नियम उपविधी नाही.मग हा करारनामा करताना कसा विचार केला नाही. तिसरी महत्वाची बाब हा करार आपल्याला लागू नाही. या करारनाम्यावर आयुक्त व उपायुक्तांच्या सहयाच नाही दोन स्थायी समितीच्या सदस्यांच्या सहया नाहीत. कायदयाने नियम बंधनकारक आहे. श्री. निकम सो. कलम नं.६६ प्रमाणे त्याला द्यायचा अधिकार आहे ऑफिस रिपोर्टमध्ये दि.१५/१०/२०१३ ला जो रक्कम दिले ती कोणत्या आधारे दिली रक्कम रू.२,९६,०००/- १५ नंबर मध्ये महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ ची तरतुद म्हटेल ती तरतुद कोणती जर परिवहन समितीची गठीत नाही मग याचे रेग्युलेशन कोणाच्या नियंत्रणाखाली चालते.

मा.उपायुक्त (सा.) श्री. बेहेरे :- मा.आयुक्तांच्या

मा.श्री. दिप चव्हाण :- करारनाम्यामध्ये परिवहन समिती गठीत झालेली नाही असा करारनाम्या मध्ये उल्लेख करायला पाहिजे.समिती गठीत नसताना तुम्ही करारनाम्यावर स्वाक्षरी करता. लेखाशिर्षक आहे का.

मुख्यलेखाअधिकारी श्री. शेलार :- गठीत नाही.

मा.श्री. दिप चव्हाण :- म्हणजे हे बेकायदेशीर आहे. या कागदपत्रांना एवढा उशीर झाला आणी ऑफिस रिपोर्ट लिहता १३ तारखेला अर्जंट अजेंडा काढता अजेंडा सुट्टीच्या दिवशी अजेंडा दिला. कागदपत्र पहायला वेळ मिळाला नाही. २००५ ला काय ठराव झाला B.O.O. चा ठराव आहे २००५ च्या ठरावाप्रमाणे दोन झालेले आहे का ? पहिला अभिकर्ता कोण होता किती महिने चालू ठेवला

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- अहमदनगर प्रवासी व व माल वहातूक संघ .

मा.श्री. दिप चव्हाण :- त्याला रॉयल्टी किती दिली.त्यांनी नोटीस दिली होती.त्या रॉयल्टीची मागणी २८/७/२००८ ला केली. त्यावर ठराव असा झाला की - वेळो वेळी बस सेवा बंद केली जाते,पैसे खात्यात जमा करीत नाही,अभिकर्त्याला रॉयल्टी,अनुदान देउ नये, नवीन अभिकर्ता नेमण्याची करावाई करावी. जर हा ठराव असा आहे तर दि.१५/१०/२०१३ चा ठराव २.९६ लाख रूपये देण्याचा ठराव कसा केला.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- ठेकेदार नवीन होता.१८ महिन्या रू.१ लाख रॉयल्टी देणेबाबत ठराव झाला रू.१८ लाख रॉयल्टी दिलेली आहे त्यानंतर डिझेलचे भाव वाढले. इतकी थकबाकी ११ लाख रॉयल्टी अनुदान सरासरी १ लाख धरून मागणी केली दोन्ही २६/२/२०७ला त्याच्या महासभेचा

ठराव झालेला आहे त्यावेळी फक्त २ लाख असलेले होते. ठराव वाचून दाखविला. दैनंदिन खात्यात भरणा करीत नाही. कायदेतज्ञाचा अभिप्राय होण्यात आला. अभिकर्त्यास रॉयल्टी व अनुदान देवू नये नवीन योग्य ठेकेदार नेमण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही करायची,

मा.श्री.दिप चव्हाण :- मग १५/१० चा २.९६ चा ठराव कसा आला.

मेकॅ.इंजि.श्री. निकम :- संस्था नवीन नेमल्यामुळे.

मा.श्री.दिप चव्हाण :- अभिकर्ता बदल्यानंतर करार बदलत नाही १५/१० च्या ठरावानुसार त्याला ५० हजार कराचे घ्यायचे होते केव्हापासून दयावयाचे होते.प्रसन्नाने आपल्याकडे जागा मागीतली होती का. जून २०१३ पासून मागणी केली.

मा.श्री. दिप चव्हाण :- ठरावामध्ये पूर्वलक्षी प्रभावाने दयावा असे कुठे आहे ते दाखवा.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- रू.६०,०००/- माहे अदा करावे ठराव वाचून दाखविला. या ठरावाने आपण रू.६०,०००/- दिले त्यानंतर दोन जणांची कमिटी नेमली त्याचा अहवाल महासभेत आला.

मा.श्री. दिप चव्हाण :- दि.३/८/२०१३ पासून १५ लाख कोणत्या हेडखाली दिले.

मुख्यलेखाअधिकारी श्री. शेलार :- वर्कशॉप दुरूस्ती या हेडखाली दिले हेडच नव्हते.

मा.श्री.दिप चव्हाण :- ठराव भाडेपोटी केला देता वर्कशॉप दुरूस्ती अंतर्गत केला बँक हेड देता येत नाही. रू.१५ लाख जबाबदारी कोणाला फिक्स करायची. ठराव होतो. तुमचे काम कोणत्या कायद्याने चालते. २८/७/०६ चे पत्रात तुम्ही त्या संदर्भात काही म्हणत नाही. शाळा सुरू होतात तेव्हा हे बस बंद करतात. पहिल्या ठेकेदार सोडून गेल्यानंतर पूर्ण मनपा गाडया या मनपाच्या नावे केलेल्याआहेत. मनपाच्या मालकीच्या असताना रू.२ लाख रॉयल्टी कशाला द्यायची त्या सगळया गाडया सिल केल्या व कोर्टात दावा ठोकला.१५ पत्रे या संदर्भात चालू आहे त्याचा एकही उल्लेख आलेला नाही. रू.१कोटीचा दरवाढ झालेला आहे याची जबाबदारी कोणाचा फिक्स करायची ऑडीटर यांनी ही दरपत्रक घेतली नाही.आता पहिला रू.२ लाख देता येत नाही म्हणून ठरावीत व दुरूस्त्या रू. २ लाख २९६ हजार दिले असे असताना कोर्टात दिलेले का कोर्ट विभागाने कमीचे जेव्हा B.O.O. चा करार झाला तसे रद्द करायला पाहिजे होत मनपा एखादया संस्थेला अनुदान देवू शकत नाही आपण रॉयल्टी घेत असतो. जनतेच्या सेवेसाठी नाममात्र अनुदान घेतो बससेवा त्यांनी तेव्हा सुरू किती बस देणार होता. फेब्रुवारी २०११ पासून सुरू किती १५ ते ३० बस देणार होता किती बस पुरविल्या किती दिवस आता दिली चालू २३ बस जवळजवळ अडीच वर्ष बारा ते चौदा चालू ९ बस कमी केल्या.

मेकॅ.इंजि.श्री. निकम :- नादुरूस्त आहे असे तो म्हणतो.

मा.श्री.दिप चव्हाण :- करारनाम्याची पूर्तता केली नाही., ही बससेवा जळगावला चालू होती. या सगळया बसेसवर बँकेचे ३,३ हप्ते थकलेले होते त्यानंतर ती २०१२ ला सर्व गाडया त्याने या शहाराच्या माध्यमातुन निरंक केल्या सगळया गाडया नफयात आणखा मग कसा तोटा होवू शकतो. करारनाम्यात अकौंटींग पहायचा अधिकार ठेवला नाही. १५० कि.मी. मध्ये ५ हजार कमावतो एक गाडीला ८२२ रू. पडताल आता मागणी केल्याप्रमाणे एका गाडीला नुकसाना भरपाई २३ हजार , पडती १९४४ रू एका गाडीला मिळतात,या ७ लाखाप्रमाणे त्याला मिळतात. त्यात तिकीट विक्रीचे नाही. ८ गाडया शिफ्ट करायचा विषय घेतला त्यापैकी ४

...८

गाडया एका शाळेला त्याने विकल्या आहेत चार गाडयाचे काम चालू आहे.

मेकॅ.इंजि.श्री.निकम :- आपल्या NOC शिवाय तो बसेस विकू शकत नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- मा. महापौर , स्थायी समिती, नगरसेवक यांना बदनाम करण्याची प्रक्रिया चालू आहे, महासभेला वेडयात काढतो समितीला वेडयात काढतो, प्रशासनाचे काम आंधळयाप्रमाणे चालले आहे.यांच्या संदर्भात लेखा परिक्षणाचा कामकाजाला करारनाम्यामध्ये रू.५००/- च्या स्टॅपपेपरवर केला.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- २००८ चा ठराव संस्थेला लागू आहे. नवीन प्रक्रिया लागू करण्यासाठी नवीन टेंडर प्रक्रिया राबविली.

मा.श्री.सचिन जाधव :- अनुदान कोण देते.

मा. मा.श्री.दिप चव्हाण :- श्री. अनारसे साहेब हे तुमचा अभिप्राय सांगा हे कायदेशीर आहे का. B.O.O. तत्वावर आलेले तर अनुदान देत येत नाही असे माझ्या माहितीत आहे. अटी शर्ती नुसार अनुदान देता येत नाही. प्रशासनाने अनुदान देणे अनुज्ञेय ठरत नाही असा अभिप्राय दिला आहे.मग शेलार साहेबांनी रू.९६ लाख कसे दिले.

मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :- महासभेने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी केली आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- अभिकर्ता संस्थेला नुकसान भरपाई देण्याचा ठराव १५ ऑक्टोंबर २०१३ ला महासभेत झाला, प्रशासनाने मात्र ऑगस्ट २०१३ मध्येच संस्थेला १५ लाख ६० हजार रूपये अदा केले आहेत. वर्कशॉप दुरूस्तीच्या हेडखाली हे पैसे देण्यात आले. दुरूस्तीच्या हेडखाली नुकसान भरपाई कशी देवू शकता. महापालिकेने संस्थेला सप्टेंबर २०१३ ला रू.२ लाख ६० हजार , १४ नोव्हेंबर या एकाच दिवशी दोनदा ६० हजार रूपये आणि १२ नोव्हेंबर ला रू. २ लाख ९६ हजार रूपये दिले आहेत हे पैसे वसुल करण्यासाठी अभिकर्ता संस्थेला नोटीस दया. त्याने नकार दिला तर संबंधीत अधिका-याकडून हे पैसे वसुल करावेत. एखादा ठराव चुकीचा केला तर ४५१ खाली विखंडीत करण्याकरीता पाठवायचा अधिकार आहे. यापुर्वी दिलेल्या रकमाबाबत तीन तीन महिन्यात अहवाल देणे बंधनकारक असताना तसे केलेला लेखा परिक्षण अहवाल सादर केलेला नाही.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- २.९६ ची नुकसान भरपाई दिली ज्या वेळेस ऑफिस रिपोर्ट काय आहे.त्याच्यावर कुठलीही चर्चा झालेली नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- श्री. दिपक मगर हा अॅथॉराईज नाही त्याने आतापर्यत मनपाशी पत्रव्यवहार कसा केला याची चौकशी करावी.

मा.श्री.दिप चव्हाण :- आपत्कालीन व्यवस्था झाली, पाणी विस्कीतपणा झाला, एल.बी.टी. संदर्भात तातडीची मिटींग घेत नाही. फक्त देण्यासाठी मिटींग घेता. ऑफिस रिपोर्ट वाचण्यासाठी ऑफीस उघडे का ठेवले नाही सगळा मनमानी आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- सभेला हे कळविले पाहिजे. त्याने बससेवा बंद केलेली नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- आज त्याचे अथॅरिटी लेटर नाही, आम्हीच सगळा अभ्यास करावयाचा का ?

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- फसवणूक केली म्हणून दिपक मगरवर गुन्हा दाखल करा.

मा.श्री.सचिन जाधव :- आपल्या करारामध्ये असे लिहिले आहे कि,बस सेवा बंद राहिल्यास प्रतिदिन

दंडआकारण्याची तरतुद केली आहे.दंड आकारणी प्रतिदिन रू.१०००/-आकारला पाहिजे.आपण व्याज,दंड मागत नाही.उलट आपण त्याला रक्कम देतो.हा विषय आयुक्त किंवा परिवहन समिती पुढे होणे आवश्यक आहे.आपण जुन्यागाडया घेवून महानगरपालिके मार्फत चालविता येतात का?

मा.श्री.दिप चव्हाण :- प्रोफेसर कॉलनी जवळ त्याचे गाडीचे चाक निघवून पडले गाडया त्यानी खराब वापरल्या पण त्याच्यावर कार्यवाही केली नाही.आपण त्याचा हिशोब धरीत मात्र नाही.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- १० ते १२ हजार प्रवासी असतात. प्रवास १२ तास याची हिशोब जर केला तर ७६ तास दररोज होतात.

मा.श्री.दिप चव्हाण :-बजेट बाबत जर तातडीची मिटींग झाली असती तर वर जनतेत चांगला संदेश गेला असता.

मा.सभापती साहेब :- सर्व सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार दिपक मगर ला काही अधिकार आहेत का. ज्या परदेशींनी करार केला ते इथे आले नाही.त्यांना बोलवा विषय स्थगित ठेवू. श्री. दिप चव्हाण सोा. यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्याचा अभ्यास करून श्री.मगरशी चर्चा करावी.कायदेशीर सल्लागार सुध्दा याठिकाणी उपस्थित ठेवा.

मा.श्री. सचिन जाधव :-अभिकर्ता गाडया विकण्याच्या तयारीत आहे पण त्या गाडया शहराबाहेर जाता कामा नये.

मा.श्री.दिप चव्हाण :-आज कंपनीचा प्रतिनिधी उपस्थित नसल्याने आजची सभा स्थगित करण्यात यावी. उदया १ वाजता सभा पुन्हा सुरू करावी.ही बससेवा बंद करू नये याबाबत त्याला कळविणे.

मा.सभापती साहेब : आजची सभा तहकुब करण्यात येत आहे. उदया अभिकर्त्याला बोलावा दि.१७/६/२०१४ रोजी दुपारी १.०० वा सभा सुरू करण्यात येईल.

**दिनांक १६/०६/२०१४ रोजी सभेचे तहकुब केलेल्या व पुन्हा पुढे चालू दिनांक १७/०६/२०१४ रोजी सभा सुरू दुपारी १ वाजता सुरू.**

मा.सभापती साहेब :- शहर बससेवा बंद करण्याची नोटीस ज्या अधिकृत प्रतिनिधी करायला पाहिजे त्यांनी केला नाही त्यामुळे त्यांना उपस्थित राहणेकरीता व माहिती देण्याकरीता काल सभा तहकूब केली होती.

मेकॅ.इंजि.श्री. निकम :- अभिकर्त्याचे प्रतिनिधी येथे आले होते.परंतु थांबून निधून गेले.

मा.श्री.दिप चव्हाण :- ते येणार ना.त्यांनी नोटीस दिली ती आपल्याला लागू होती का,श्री.मगर यांना दिलेले अधिकार पत्र आपल्याला दिले आहे.नोटीस का कशी लागू होते.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- आयुक्तांचे म्हणणे काय आहे पैसे दयावे किंवा कसे टिपणीत काय उल्लेख आहे.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- पैसे देवू नये असे मत आयुक्तांनी दिले आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- त्याचे रू.१०लाख डिपॉझिट येथे जमा करून घ्यायचे व गाडया विकण्यात परवानगी देवू नये. अटी शर्तीचा भंग केल्याने त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा मनपाने NOC दयायची नाही.

...१०

मा.सभापती साहेब :- करारनाम्याच्या प्रति पत्रकरांना सुध्दा देण्यात याव्यात, जनतेला कळू दया.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- करारनाम्यातील अट अशी आहे की, नगरविकास विभाग सचिवाकडे त्याने दाद मागावी. ३ महिने नोटीस दिल्या शिवाय तो सेवा खंडीत करू शकत नाही

मा.श्री. सचिन जाधव :- यापुढे नोटीस दिल्यावर मुदत लागू होईल.

मा.सभापती साहेब :- श्री. दिपक मगरने दिलेली नोटीस कायदेशीर आहे का ?

मा.श्री. दिप चव्हाण :- तहकुब कोणत्या विषयावर सभा स्थगित झाले. परदेशीला बोलविल्या संदर्भात फोन केला तो आला नाही काल दीड दोन तास चर्चा झाल्यानंतर याठिकाणी मुख्य लेखापाल यांनी रूलींग दिले त्याला नोटीस देता येत नाही.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- जळगाव मनपात हीच एजन्सी काम करते तिथला अहवाल मागवा कशा पध्दतीने कम चालते.

मा.श्री.दिप चव्हाण :- नोटीस कोणती ग्राहय धरायची कोणत्या तारखेची ग्राहय धरायची कोणत्या नोटीसच्या आधारावर सभा बोलविला.

मेक.इंजि. श्री. निकम :- मुळ विषय वेगळा आहे NOC देण्याबाबत आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- करारानाम्या प्रमाणे ३ महिन्याची नोटीस असेल तर बंद करू शकतो. कशाच्या आधारे चर्चा चालू आहे कालची नोटीस संदर्भात चर्चा होती. करारनाम्यामध्ये श्री. मगर नाहीच आहे. दिपक मगर नोटीस देवू शकतो का. कायदेतज्ञानी अभिप्राय दयावा.

मा.सभापती साहेब :- नोटीस कायदेशीर आहे का.

वकील ॲड.श्री.मंगेश दिवाणे :-जर करारनामा समाप्त करणेचा कलम वाचला असता ३ महिन्याची नोटीस देणे आवश्यक आहे.त्यावर रोहीत परदेशी ची सही पाहीजे, दिपक मगरची नोटीस आपल्याला लागू होत नाही.

मा.सभापती साहेब :- प्रशासनाची आयुक्तांची चुक झाली त्याचे पत्र अधिकृत नाही मगर जर अधिकृत नाही मग मिटींग कशाला कॉल केली.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मासिक तोटा भरपाई अनुदानाबाबत हे पत्र मगरने दिले ते पत्रला अधिकृत नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- या पत्राच्या व मिटींगच्या अनुषंगाने दिपक मगरवर गुन्हा दाखल करण्यात यावा मनपाची फसवणुक केली, परदेशीची परवानगी न देता ,जनतेची, प्रशासनाची फसवणुक केली. आतापर्यत त्याला जे बेकायदेशीर पैसे दिले त्याची जबाबदारी निश्चित करावी. प्रशासनाने कार्यवाही करावी. लेखाशिर्षक याचे तयार केले नाही.१०५,१०६ कलम लेखाशिर्ष बदलणे संक्रमण करणेची आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- २१ लाखाचा प्रस्ताव होता लेखाशिर्षवर निरंक तरतूद होती ती वाढविण्या संदर्भात मोटर व्हेईकल विभागाने पत्र दिले. वर्कशॉप दुरूस्ती लेखाशिर्षातून ६० हजार भाडे देण्याची तरतुद नाही.

मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :- बजेट हेड नसेल तर तरतुद करावी लागते. ठराव झाला त्याची ठरावाची अंमलबजावली करणेत आली आहे. लेखाशिर्ष तरतुद करण्यासाठी पत्र दिले.

मा.श्री.दिप चव्हाण :- तुमचे मत कायदेशीर पाहिजे.

मा.श्री. दिप चव्हाण :- त्याला दिलेली पूर्ण रक्कम वसुल करा ज्याचे हाताने चूक झालेल्या अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करा.आता बससेवेचे बाबतीत लिगल रिटनेरचे मत घेतल्या शिवाय मनपा सभे पुढे विषय ठेवू नका. १० वर्ष सेवा चालवावी. बंद करता कामा नये जे काही नुकसान होईल ती अभिकर्त्याची जबाबदारी राहील करारनाम्यामध्ये तशी तरतुद आहे. त्यांनी जर काही कारणास्तव कुठल्याही प्रकारची NOC मागीतली तर ती देण्यात येवू नये. १० वर्ष झाल्यानंतर करार संपल्यानंतर जे काही त्याचे देणे घेणे असेल ते करण्यात यावे.

मा.श्री. सचिन जाधव :- जेव्हा त्यांना आपण पैसे दिले त्यावेळेस जर श्री. मगरचे पत्र असेल तर जे काही त्याला पैसे दिले तो वसुल करण्यात यावे. महासभेत ठराव झालेला आहे. त्यावेळेस मंजूरी दिली त्याची जबाबदारी निश्चित करा.

मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :- ठराव क्र.१५ दि.११/७/२०१३ च्या ठरावात असे म्हटले आहे. ठराव जुलै महिन्यात बजेट मंजूर झाल्यानंतर झाला.प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी केली.

मा.श्री.दिप चव्हाण :- ठराव जर बेकायदेशीर असेल तर ४५१ खाली ठराव रद्द करण्याची तरतुद आहे प्रशासनाची जबाबदारी आहे. तुम्ही मुख्यलेखापाल आहात, प्रशासन ठरवेल कोण जबाबादार आहे.दिपक मगरचे पत्र बेकायदेशीर आहे.

मा.श्री.अजिंक्य बारेकर :- दिपक मगर वर काय कारवाई करायची प्रशासनाने खुलासा करावा.

मा.सभापती साहेब :- सर्व सदस्यांची जे काही मत मांडले त्यावर कायदेशीर मत ही घ्यावे. पत्र कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे प्रशासनाने याचा खुलासा करावा.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- आजच्या सभेच्या चर्चेत सांगीतल्याप्रमाणे दिलेली नोटीस कायदेशीर की बेकायदेशीर याबाबत लेखी मत घेण्यात येईल त्यानंतर मा. आयुक्तांचे मतासह निर्णय घेण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- आपण शहर बस वाहतूक सेवेच्या नोटीसवर चर्चा करत होतो तेंव्हा हा मुद्दा उपस्थित आला नोटीस कायदेशीर-बेकायेदशीर आहे. ज्यावेळेस सभेची नोटीस काढतो त्यावेळेस वकीलांना उपस्थित राहणे बाबत बंधनकारक करा. त्यांना कळविले जावे. ज्या मगर यांनी नोटीस दिली ती देत येत नाही असे लिगल रिटेनर यांनी मत दिले आहे. त्याला काही मागणी करायची ती अधिकृत प्रतिनिधीच्या स्वाक्षरीचे ९० दिवस नोटीसची मुदत देवून करणे बंधनकारक आहे. आम्ही त्याचेशी चर्चा करण्यासाठी इथे येणे बाबत कळविले, बससेवा बंद करू नये याबाबत मा. महापौर स्वतः त्यांचेशी बोलले त्याची भूमिका मांडणे बाबत कळविले परंतू ते आले नाही. बससेवा जर त्याने बंद केली तर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- दिपक मगर वर कायेदशीर काय कार्यवाही करता येईल याबाबत लिगल रिटेनर यांनी खुलासा करावा पुढील प्रोसेस चालू करा.

मा.श्री.दिप चव्हाण :- कोणत्या पत्रावर सभा बोलवाली नगरसचिवानी. सिव्हील कोर्टात केस चालू असताना आपण निर्णय घ्यायचा का. नियमावली असताना आता आपण जर काही चूक झाले तर ती प्रशासनाची जबाबदारी राहील. मनपा सभा, स्थायी समिती कायदयाप्रमाणे कामकाज करणेबाबत प्रशासनाची जबाबादारी आहे. भविष्यात या संस्थेचे नुकसान होणार नाही तेव्हा

सध्या चालू असलेल्या केसवर परिणाम होणार नाही याची दक्षता घ्या, जबाबदा-या निश्चित करीतकायदा तपासून पहा. अभिकर्ता रू.७ लाख मागतो हे सुध्दा प्रशासनाने तपासले नाही किती प्रवासी प्रवास करतात गाडया किती चालू किती बंद बाकीच्या गाडया कुठे आहेत गाडया जर जप्त करायची वेळ आली तर तुम्ही काय करणार .आपण कोणत्या जागेचे भाडे पोटी ६० हजार रूपये देतो.

मेकॅ.इंजि. श्री.निकम :- सर्व गाडया मनपाकडे लावण्याबाबत त्यांना सांगितले आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- कोणत्या जागेच्या करारापोटी त्याला रू.६० हजार देतो,त्याला जागा कोणती कोणती देता येईल ते पहावे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ,मासीक तोटा भरपाई करून देणे करारात लिहिलेले नाही. अभिकर्ता संस्थेस मासीक तोटा भरपाई अनुदानवाढवून देउ नये. बस नगरमध्येच ठेवायला लावा.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- मासीक तोटा भरपाई करून देणे हे करारानुसार योग्य नाही. अभिकर्ता संस्थेला मासीक तोटा भरपाई रकम वाढवुन देउ नये.सर्व बसेस अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्येच ठेवण्यात याव्यात.

मा.सभापती साहेब :- बस सेवा अभिकर्त्याला मासीक तोटा भरपाई करून देणे हे करारानुसार योग्य नाही.त्यामुळे अभिकर्ता संस्थेस मासीक तोटा भरपाई अनुदानामध्ये वाढ करण्यात येउ नये.सर्व बसेस अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्येच ठेवण्यात याव्यात. अभिकर्त्यास बस सेवेमध्ये काही अडचणी आल्यास करारात नमुद केल्याप्रमाणे त्याने कार्यवाही करावी.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिका अभिकर्ता संस्था चालवित असलेल्या शहर बससेवेस देण्यांत येणा-या मासिक तोटा भरपाई अनुदानामध्ये वाढ व बससेवेतील आठ बसेस कमी करून अन्यत्र हलविणेबाबतच्या ऑफिस रिपोर्ट वर चर्चा करून असा ठराव करण्यात येतो की,मासीक तोटा भरपाई करून देणे हे करारानुसार योग्य नाही.त्यामुळे अभिकर्ता संस्थेस मासीक तोटा भरपाई अनुदानामध्ये वाढ करण्यात येउ नये. सर्व बसेस अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्येच ठेवण्यात याव्यात. बससेवेतील आठ बसेस कमी करून अन्यत्र हलविणेत येउ नयेत. अभिकर्त्यास बस सेवेमध्ये काही अडचणी आल्यास करारात नमुद केल्याप्रमाणे त्याने कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक - मा.श्री.बाळासाहेब बोराटे. सही /-

अनुमोदक - मा.श्री.अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.